**महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९, नियम ६२ (८) अन्वये अभिसरण (By way of circulation) पध्दतीनुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर**

# प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, लातूर

(१) मा.श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे (भाप्रसे) जिल्हाधिकारी, लातूर - अध्यक्ष

(२) मा.श्री.सोमय मुंडे (भापोसे) पोलीस अधिक्षक, लातूर - शासकीय सदस्य

(३) श्री. गजानन नेरपगार प्रादेशिक परिवहन अधिकारी (अ.का.) - सचिव

................................................................................................

**बाब क्र ०१ : शासकीय कामासाठी अधिग्रहित करण्यात येणा-या वाहनांचे भाडेदर ठरविण्याबाबत...**

**-: प्रस्ताव :-**

१. शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनाचे वापरासंबंधी धोरणाच्या अनुषंगाने प्रादेशिक परिरवहन प्राधिकरण लातूर यांनी दिनांक १९/१०/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत वाहनांचे भाडेदर ठरविण्यात आले होते.

२. सदर भाडेदर निश्चित करण्यात येवून जवळपास ०१ वर्षाचा कालावधी झालेला आहे. सद्यस्थितीमध्ये पेट्रोल व डिझेल यांची दरामध्ये लक्षणीय वाढ किंवा घट झालेली दिसून येत नाही. तथापि, आगामी निवडणूका अनुषंगाने शासकीय वापरासाठी भाडयाने वाहन घेण्यासाठी दरपत्रकात सुसूत्रता आणणेसाठी आवश्यक ती सुधारणा करणे क्रमप्राप्त ठरते.

३. जिल्ह्यातील विविध वाहनधारकांकडून सद्य:स्थितीत भाडयाने घेण्यात येणाऱ्या वाहनांच्या भाडेदरांची माहिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे सुधारीत भाडेदर प्रस्तावित करण्यात येत आहे.

## वाहन भाडयाचे दर

❖ **प्रवासी वाहने :-**

| अ.क्र | वाहनाचा प्रकार (आसन क्षमता/भार क्षमता) | प्रतिलिटर सरासरी धाव कि.मी | प्रति कि.मी दर रु. मध्ये इंधनासहित | प्रति कि.मी. दर रु मध्ये इंधनाशिवाय | २४ तास ३०० कि.मी इंधनासहित रु. | २४ तास ३०० कि.मी इंधनाशिवाय रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दुचाकी वाहन | ४० | ८ | | ११०० (२४ तास/ १५० किंमी) | ८०० (२४ तास/ १५० किंमी) |
| २ | ॲटोरिक्षा | २० | २० | | १२०० (२४ तास/ १५० किंमी) | ८०० (२४ तास/ १५० किंमी) |
| ३ | **हलके मोटार वाहन (प्रवासी)** | | | | | |
| अ) | हॅचबॅक उदा. टाटा इंडिका, स्विफ्ट, टाटा व्हिस्टा इ. **आसन क्षमता ४+१** | १८ | ११ | ५ | ३३०० | १५०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ब) | सेदान उदा. इंडिगो स्विफ्ट डिझायर, होंडा अमेज इ. **आसन क्षमता ४+१** | १८ | १३ | ६ | ३९०० | १८०० |
| क) | **स्पोर्ट युटिलिटी व्हईकल** | | | | | |
| | इनोव्हा क्रेस्टा | १० | १६ | १० | ४८०० | ३००० |
| | इनोव्हा | १० | १४ | ९ | ४२०० | २७०० |
| | महिंद्रा झायलो /सुमो/तवेरा/क्रुझर | १३ | १२ | ७ | ३६०० | २१०० |
| ४ | **प्रवासी बस (नॉन ए.सी.)** | | | | | |
| | आसन क्षमता २० पर्यंत | १० | २६ | १३ | ७८०० | ३९०० |
| | आसन क्षमता २० ते ३५ पर्यंत | ९ | ३६ | १७ | १०८०० | ५१०० |
| | आसन क्षमता ३५ पेक्षा जास्त | ७ | ४२ | २० | १२६०० | ६००० |

## ➢ मालवाहू वाहने

| | **मालवाहू वाहनाचा प्रकार** | १ लीटर इंधनामध्ये होणारी सरासरी धाव कि.मी | **इंधन रहित** | | **इंधन सहित** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **१२ तासाचे किंवा ५० कि.मी. पर्यतचे भाडेदर** | **२४ तासाचे किंवा १०० किंमी पर्यतचे भाडेदर** | **१२ तासाचे किंवा ५० कि.मी. पर्यतचे भाडेदर** | **२४ तासाचे किंवा १०० किंमी पर्यतचे भाडेदर** |
| १ | मिनी ट्रक (GVW ३५०० kg पर्यंत) | ९ किमी | ११४०/- | २२८०/- | १७४०/- | ३४८०/- |
| २ | मिनी ट्रक (GVW ३५०० kg ते ७५०० kg पर्यंत) | ७ किमी | १४००/- | २८००/- | २२००/- | ४४००/- |
| ३ | ट्रक (GVW ७५०० ते १८५०० kg पर्यंत) | ४ किमी | २३८०/- | ४७६०/- | ३६८०/- | ७३६०/- |
| ४ | ट्रक (GVW १८५०० ते २८००० kg पर्यंत) | ३ किमी | ३१५०/- | ६३००/- | ४८५०/- | ९७००/- |
| ५ | ट्रक (GVW ३१००० ते ३५०००/- kg पर्यंत) | २.५ किमी | ४२००/- | ८४००/- | ६२००/- | १२४००/- |
| ८ | **पाण्याचे टँकर** | | **प्रति तास इंधनासहित रु.** | | **प्रति तास इंधनाशिवाय रु.** | |
| | ३००० लिटर्स पर्यंत | | **६००** | | **२५०** | |
| | ९००० लिटर्स पर्यंत | | **७५०** | | **३००** | |
| | १२००० लिटर्स पर्यंत | | **११००** | | **४००** | |
| ९ | **Earth Moving Machine** | | | | | |
| अ) | JCB | (५ लि/तास खपत) | **रु. ८००/- प्रति तास** | | **रु. ३५०/- प्रति तास** | |
| ब) | पोकलँड २१० | (१२ लि/तास खपत) | **रु. २५००/- प्रति तास** | | **रु. १५००/- प्रति तास** | |
| क) | ट्रेलर (पोकलँड मशीन वाहतुकीकरिता) | **३** | **रु. ६४००/- (१५० कि.मी.करिता)** | | **रु. ३७००/- (१५० कि.मी.करिता)** | |
| १० | ट्रॅक्टर (शेती वापरातील) | (४ लि/तास खपत) | **रु. ४००/- प्रति तास** | | **रु.१५०/- प्रति तास** | |
| ११ | ट्रॉली (शेती वापरातील) | -- | **रु. १५०/- प्रति तास** | | -- | |

| | रुग्ण वाहिका (इंधनसहित भाडे) | २० कि.मी. अथवा २ तासांकरिता भाडे | प्रति कि.मी. भाडे रु.. (इंधनसहित) | प्रति दिन (२४ तासांकरीता) भाडे रु. (धाव मर्यादा १०० कि.मी. | मासिक भाडे रु. |
|---|---|---|---|---|---|
| १२ | मारुती व्हॅन | ४००/- | १०/- | २९००/- | ८५०००/- |
| | टाटा सुमो व मेटॅडोर सदृश्य कंपनीने बांधनी केलेली वाहने | ५००/- | १२/- | ३२००/- | ९५०००/- |
| | टाटा ४०७, स्वराज माझदा (टॅम्पो ट्रॅव्हलर विंगर ) आदींच्या साठयावर बांधणी केलेली वाहने | ६००/- | १८/- | ४२००/- | ११५०००/- |
| | वातानुकुलीत वाहने | ८००/- | १९/- | -- | |

**टिप:-** प्रवासी वाहनांसाठी इंधन सहीत दर लागू करतांना प्रत्येक दिवशी किमान ३०० कि.मी वाहन चालणे अपेक्षित आहे. अंतर कमी चालल्यास ३०० कि.मी. प्रमाणे भाडे आकारण्यात येईल. वाहन वापरामध्ये आले नसेल तर वाहनाचे दर हे २४ तास/३०० कि.मी. इंधनाशिवाय असा असेल.

## ❖ <u>अटी व शर्ती :-</u>

१) खाजगी वाहने भाडयाने घेणे अनुज्ञेय नाही.

२) सदर दर निवडणूकीच्या कामासाठी, आपात्कालीन परिस्थितीत व इतर शासकीय कामासाठी वाहने अधिग्रहीत करण्यासाठी लागू करावेत.

३) प्रत्येक वाहनासाठी तपशिलवार माहिती असेलेले स्वतंत्र लॉगबुक ठेवावे.

४) वाहन ताब्यात घेतल्यापासून ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरला जाईल.

५) १२ तासापर्यंतचा कालावधी अर्धा दिवस धरावा व १२ तासांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे अदा करावे.

६) इंधन शासकीय कार्यालयातर्फे कोष्टकानुसार पुरवावे किंवा त्याचा खर्च कि.मी. प्रमाणे (कोष्टकाप्रमाणे) सरासरी काढुन वेगळा दयावा. त्यासठी झालेली धाव कि.मी. मध्ये प्रत्यक्ष तपासावी.

७) हया दराव्यतिरिक्त कुठलेही भत्ते/ चार्जेस अनुज्ञेय नसतील.

८) हलके संवर्गातील वाहने शक्यतो ५ वर्षापेक्षा जास्त जुनी नसावीत.

९) वाहनाचा देखभाल खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाचीच राहील.

१०) वाहन नादुरूस्त,खराब, अपघातग्रस्त झाल्यास लगेचच दुसरे बदली वाहन पुरविण्याची जबाबदारी वाहन मालकाचीअसेल.

११) वाहनाचे/ चालकाचे सर्व कागदपत्रे जसे नोंदणी, कर,विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, चालकाची अनुज्ञप्ती, बिल्ला इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.

१२) टोल व पार्किंग चार्जेस लागू असल्यास वाहन वापरणा-या कार्यालयाने भरावयाचे आहे.

१३) जीएसटी किंवा अन्य कायदेशीर वजावटी आवश्यक असल्यास त्या करण्यात याव्यात व त्याचे

प्रमाणपत्र संबंधीतांस देण्यात यावे.

१४) सदर दर नॉन एअरकंडीश्न्ड (नॉन एसी) वाहनाचेच आहेत. मात्र त्याच प्रकारचे एअरकंडीश्न्ड (ए.सी.) वाहन वापरल्यास २० टक्के जादा दराने भाडे देय राहील. एसी वाहन वापरणारी व्यक्ती त्याचप्रकारचे वाहन वापरण्यास पात्र असल्याबाबत संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांची मान्यत असणे आवश्यक आहे.

सदर बाब विचारार्थ व निर्णयार्थ प्राधिकरणासमोर सादर करण्यात आली.

**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण लातूर दि. ०७/११/२०२३ ठराव क्र. ०१/२०२३**

---

**प्रस्ताव**

**बाब. क्र. ०१ :-** निवडणूकीच्या कामासाठी, आपत्कालीन परिस्थितीमध्ये व इतर शासकीय कामासाठी अधिग्रहीत करण्यात येणाऱ्या वाहनांच्या भाडेदारास प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, लातूर यांचेकडील ठराव क्र. ०१/२०२३ महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ नियम ६२ (८) अन्वये अभिसरण (By way of circulation) पध्दतीने मान्यतेस्तव सविनय सादर.

30/11/23

**सचिव**
**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,**
**तथा**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी**
**लातूर (अ.का.)**

मान्य / अमान्य

30/11

**शासकीय सदस्य**
**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,**
**तथा**
**पोलीस अधीक्षक, लातूर**

मान्य / अमान्य

**अध्यक्ष**
**प्रादेशिक परिवहन प्राधिकरण**
**तथा**
**जिल्हाधिकारी, लातूर**